**<u>नियमित दिवाणी दावा क्र.–३०१ सन २०२२</u>**

फुलचंद फडतरे वि. दिनकर फडतरे

CNR NO-MHST120009052022

**<u>निशाणी १ लगत आदेश</u>**

( दि.–३०.०४.२०२३)

१. आजरोजी वादी क्र.१ व २ हजर व प्रतिवादी क्र.५ स्वतःसाठी व प्रतिवादी क्र.१ ते ४, ६ ते ३४ करीता मुखत्यार म्हणून हजर तसेच त्यांचे विधीज्ञ लोक अदालतीमध्ये पॅनेलसमोर हजर झाले.

२. **<u>नि. २९ वर</u>** उभय पक्षकरांनी आपसांत तडजोड झाल्याबाबत तडजोड पुरसिस सादर केली. ती तडजोड पुरसिस उभय पक्षकारांनी वाचून मान्य केली. **<u>निशाणी ३० वर</u>** राष्ट्रीय लोकअदालतीच्या विहीत नमुन्यातील तडजोडीवर उभय पक्षकारांनी त्यांचे सही व निशाणी अंगठे केले आहेत.

३. या दाव्यातील **<u>नि.२९ वरील तडजोड पुरसिसचे</u>** अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, **<u>प्रतिवादी नं.१५,१६ यांनी त्यांचा दावा मिळकतीमध्ये येणारा कायदेशीर हिस्सा वादी व प्रतिवादी क्र.१३ व १८ यांचे लाभात सोडलेला आहे</u>. <u>तसेच प्रतिवादी क्र.२१ यांनी त्यांना दावा मिळकतीमध्ये येणारा कायदेशीर हिस्सा हा वादी व प्रतिवादी क्र.१, ३ व ४ यांच्या लाभात सोडलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.२२, २३ व २४ यांनी</u>**

**त्यांना दावा मिळकतीमध्ये येणारा कायदेशीर हिस्सा हा वादी क्र.२ याच्या लाभात सोडलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.२५ ते ३७ यांनी त्यांना दावा मिळकतीमध्ये येणारा कायदेशीर हिस्सा हा प्रतिवादी क्र.१, ५ व ९ याच्या लाभात सोडलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.३० ते ३२ यांनी त्यांना दावा मिळकतीमध्ये येणारा कायदेशीर हिस्सा हा प्रतिवादी क्र.७ व ८ याच्या लाभात सोडलेला आहे.**

४. **निशाणी २९ वरील** तडजोड पुरसिस उभय पक्षकारांनी मान्य केलेली असल्याने त्यानुसार दावा तडजोडीने निकाली करणे न्यायसंगत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि.२९ वरील तडजोड पुरसिसनुसार व नि.३० वरील लोकन्यायालयाच्या विहीत नमुन्यातील तडजोड पुरसिसनुसार दावा निकाली करण्यात येतो.
२. नि.२९ व ३० वरील तडजोड पुरसिसला अनुसरुन अॅवॉर्ड/हुकूमनामा तयार करण्यात यावा.
३. दाव्याचा खर्च वादी व प्रतिवादींनी आपआपला सोसावा.
४. नियमाप्रमाणे न्यायालयीन शुल्क परतावा करण्यात यावा.
५. ओळखपत्र किंवा आधार कार्डची प्रत हे अॅवॉर्डचा भाग समजण्यात यावा.

Swapnali Balaso Lendave
Digitally signed by Swapnali Balaso Lendave
Date: 2023.05.02 14:46:38 +0530

म्हसवड, ता. माण,
दि.३०.०४.२०२३

(**एस. बी. लेंडवे**)
**पॅनेल प्रमुख, लोक अदालत** तथा
सह– दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, **म्हसवड**, ता. माण

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | J.A. Patel Stenographer |
| Name of Court | C.J.J.D.,Mhaswad, Tal.Man |
| Date of Dictation | 30.04.2023 |
| Order signed by the P.O. on | 30.04.2023 |
| Order uploaded on | 30.04.2023 |